# कोपरगावचे अवैध धंदे 'जैसे थे' !

## कोपरगाव पोलिसांचा निर्ढावलेपणा अधोरेखित

**डॉ. अशोक सोनवणे**

**अहिल्यानगर** : कोपरगाव तालुका आणि शहर परिसरातील अवैध व्यवसाय सुरु असल्यामुळे कोपरगावची कायदा सुव्यवस्था पूर्णपणे मोडकळीस आलेली आहे. याच विषयासंदर्भात दैनिक लोकमंथन मधून आम्ही कोपरगाव शहर आणि तालुका ग्रामीण पोलीस स्टेशन जनजागृती व्हावी या उद्देशाने सलग पाच दिवस धडे गिरवूनही फोल ठरले. आजही कोपरगाव शहर आणि तालुक्यात अवैद्य व्यवसायाची परिस्थिती जैसे थे आहे.

कोपरगाव अवैध व्यवसायाचा विषय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या समोर जाऊनही किंचितही कारवाई होत नसेल तर यातून पोलीस प्रशासनाची निर्ढावलेपणाची भूमिका चांगलीच अधोरेखित झाली आहे. याबाबत अधिकाऱ्यांचीही आळी मिळी गुपचिळीची भूमिका बघायला मिळत असून जर वरिष्ठ अधिकारी याकडे लक्ष देणार नसतील नकळतपणे या अवैध व्यवसायांना त्यांचीही साथ आहे असे म्हणण्यास मोठा वाव आहे.

कोपरगाव तालुक्यात अवैध दारू, चक्री, मटका, जुगार,गांजा, गुटखा यामुळे अनेक प्रपंच देशोधडीला लागले असून तरीही स्वार्थापोटी कोपरगाव पोलीस या व्यवसायांना पाठीशी घालत स्वतःचे प्रपंच मोठे करत आहे हे तालुक्याचे मोठे दुर्दैव म्हणावे लागेल. अवैध माया गोळा करण्याची जबाबदारी दोन्ही पोलीस स्टेशनला मराठवाड्याचे दोन सुपुत्र सांभाळतात. ज्या तालुक्यात लोकप्रतिनिधींनी अवैध व्यवसाय बंद करण्याचे निवेदन देऊन मुख्यमंत्र्याच्या कानावर टाकूनही तसेच माध्यमांनी ही समस्या उचलून धरूनही परिस्थिती जैसे थे असेल तर या व्यवस्थेस नेमके काय म्हणायचे हा नागरिकांना पडलेला प्रश्न आहे. आम्ही केलेल्या सर्वेक्षणात कोपरगाव शहर आणि ग्रामीण भागातील येसगाव, करंजी बु. येथे अवैध दारु विक्री जोरदार आढळून आली.

### अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संपत्तीचे मूल्यमापन होणे गरजेचे

▶ सज्जनांचे रक्षण करण्यास आणि दुर्जनांवर नियंत्रण ठेऊन त्यांचा नायनाट करण्यास कटिबद्ध असलेले पोलिस प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचारी यांची दरमहा लाखो रुपयांच्या उलाढालीने साधा पोलिस शिपाई देखील चारचाकीशिवाय फिरत नाही अशी स्थिती आहे. इतकी माया कशी गोळा केली गेली? यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कमावलेल्या अवैध संपत्तीचे मूल्यमापन होणे हे काळाची गरज आहे.

### पोलीस महासंचालकांना उद्या आम्ही देणार पुरावे

▶ कोपरगाव शहर आणि तालुक्यात अवैध धंदे सुरु असून त्यातून पोलीस कर्मचाऱ्यापासून ते अधिकाऱ्यांपर्यंत अनेकांनी कोट्यवधींची माया जमा केली आहे. अवैध धंद्यांना पोलीस पाठीशी घालून गब्बर होत आहे. यासंदर्भात मी स्वतः डॉक्टर अशोक सोनवणे उद्या मंगळवारी पोलीस महासंचालक आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचा अतिरिक्त कारभार असलेल्या रश्मी शुक्ला यांची भेट घेऊन पुरावे सादर करून कोपरगाव शहर आणि तालुक्यातील अवैध धंद्याचा लेखाजोखा मांडणार आहोत. मात्र, त्यासोबतच आ. आशुतोष काळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र दिले होते, त्याचे पुढे काय झाले?

# कर्जतमध्ये राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन

**लोकमंथन प्रतिनिधी**



**कर्जत** : विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने कर्जत येथे भव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते होणार असून हे प्रदर्शन दिनांक १ ते ५ जानेवारी २०२६ या कालावधीत भरविण्यात येणार आहे, अशी माहिती कृषी उत्पन्न बाजार समिती कर्जतचे सभापती काकासाहेब तापकीर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, जिल्हा सहकारी बँकेचे संचालक अंबादास पिसाळ, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे प्रदेश सरचिटणीस राजेंद्र गुंड हे उपस्थित होते. गेल्या वर्षी कर्जत तालुक्यात प्रचंड प्रतिसाद मिळालेल्या कृषी प्रदर्शनामुळे आणि शेतकरी बांधवांच्या वाढत्या मागणीमुळे यंदा पुन्हा एकदा राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे आयोजन सद्गुरु ग्रामविकास प्रतिष्ठान, कृषी उत्पन्न बाजार समिती कर्जत व अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

पत्रकारांना माहिती देताना राजेंद्र फाळके व अंबादास पिसाळ म्हणाले की, या प्रदर्शनात शेती विषयक अत्याधुनिक ट्रॅक्टर्स, अवजारे, बी–बियाणे, रासायनिक व जैविक खते, कीटकनाशके, सेन्सर तंत्रज्ञान, ठिबक सिंचन, दूध काढणी यंत्रे, पशुखाद्य, कुक्कुटपालन, शेळीपालन, मधुमक्षीपालन, रोपवाटिका यांसह शेतीपूरक व्यवसायांशी संबंधित विविध स्टॉल्स उपलब्ध असणार आहेत. तसेच शासकीय योजनांची माहिती देणारे कृषी विद्यापीठ, जिल्हा कृषी विभाग, तालुका कृषी विभाग, आत्मा, तसेच विविध शासकीय बँकांचे मार्गदर्शन व माहिती केंद्रेही या ठिकाणी असणार आहेत. या प्रदर्शनास किमान दोन लाखांपेक्षा अधिक शेतकरी भेट देतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# शेतरस्ता खुला करा; शेतकऱ्यांची तहसीलदारांकडे मागणी

**लोकमंथन प्रतिनिधी**

**जामखेड** : तालुक्यातील वाकी गावातील गट नं. १०९ मधील काही शेतकऱ्यांना शेतात जाण्या–येण्यासाठीचा वहिवाट रस्ता अद्याप खुला करण्यात आलेला नसल्याने मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. हा रस्ता तातडीने खुला करावा व अडथळा आणणाऱ्यांना कायदेशीर समज देऊन अडथळे दूर करावेत, या मागणीसाठी शेतकरी गेल्या काही वर्षांपासून जामखेड महसूल विभागाकडे लेखी व तोंडी पाठपुरावा करत आहेत.

शेतकऱ्यांनी तहसीलदारांकडे दिलेल्या विनंती अर्जात नमूद केले आहे की, जामखेड तहसील कार्यालयात वहिवाट दावा क्र. ८१/२०२५ दाखल करण्यात आला असून, दि. १७/११/२०२५ रोजी पारित आदेशानुसार मौजे वाकी ता. जामखेड येथील गट नं. १०९ मध्ये जाण्यासाठी गट क्र. ११५/१/२/३ व १५२/२ मधील अडथळे दूर करून वहिवाट रस्ता खुला करणे अत्यावश्यक आहे.

या आदेशात प्रतिवादींना सात दिवसांच्या आत स्वखर्चाने अडथळे काढून रस्ता मोकळा करून देण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले होते. अन्यथा मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ च्या कलम २१ अन्वये मंडळ अधिकारी नायगाव व सहायक पोलीस निरीक्षक खर्डा यांच्या प्रतिनिधींच्या देखरेखीखाली अडथळे काढण्याची कारवाई करण्याचे आदेशही देण्यात आले होते. मात्र, आदेश होऊनही अद्याप रस्ता खुला करण्यात आलेला नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

दरम्यान, जामखेडला नव्याने नियुक्त झालेले तहसीलदार बांगर यांनी तरी आदेशानुसार मंडळाधिकारी व पोलीस प्रशासनामार्फत पुढील कारवाई करून शेतकऱ्यांना लवकरात लवकर न्याय द्यावा, अशी जोरदार मागणी वाकी येथील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# गावरान कांद्याची लागवड जोमात!

## खर्च, मजूर टंचाई आणि बाजारभावामुळे शेतकरी चिंतेत

**लोकमंथन प्रतिनिधी**



**श्रीगोंदा** : तालुक्यात पारंपरिक गावरान कांदा आणि ऊस लागवडीचा हंगाम जोरात सुरू असला तरी शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरची चिंता काही कमी होताना दिसत नाही. गुलाबी कांद्याची लागवड तुलनेत कमी झाली असून गावरान कांद्याची मोठ्या प्रमाणात लागवड सुरू आहे. परंतु उत्पादन खर्चात झालेली प्रचंड वाढ, मजुरीचे वाढते दर आणि रोपांच्या कमतरतेने कांदा उत्पादकांचे गणित पूर्णपणे विस्कटून टाकले आहे.

एकरी १२ ते १३ हजार रुपयांपर्यंत लागणारा मजुरीचा खर्च, रोटरिंगपासून वाफे तयार करण्यापर्यंतचे तांत्रिक काम आणि त्यासाठी लागणाऱ्या मजुरांची टंचाई या सर्वांनी शेतकऱ्यांच्या खांद्यावरचा भार अधिकच वाढवला आहे. परिस्थिती अशी की तालुक्यातील अनेक शेतकरी बाहेरील गावांतून मजूर बोलवून लागवड पूर्ण करत आहेत.

दरवर्षीप्रमाणे यंदाही शेतकरी उसनवारी, कर्जे आणि दागदागिने तारण ठेवून कांदा पिकाची लागवड करत आहेत. पण गेल्या वर्षी दोन पैसे अधिक मिळतील या आशेने साठवून ठेवलेला कांदा खराब झाला. त्यामुळे यंदाच्या हंगामाबाबत शेतकऱ्यांमध्ये भीती अधिक आहे.

कुकडी , घोड ,कॅनॉल व भीमा नदी पट्ट्यातील शेतकऱ्यांनी द्राक्ष, डाळिंब, लिंबू, ऊस, मका, हरभरा, ज्वारी, गहू यांसह गावरान कांद्याच्या लागवडीस सुरुवात केली आहे. चालू वर्षी पावसाने साथ दिली असली तरी बियाणे, खते आणि औषधांच्या वाढलेल्या किमती शेतीची खरी अडचण बनल्या आहेत. पीक पिकवणे शेतकऱ्यांच्या हातात असले तरी बाजारभाव मात्र त्यांच्यापासून दूरच राहिला आहे.

शेती ही उपजीविकेचा आधार असला तरी दिवसेंदिवस वाढत जाणारा खर्च आणि अनिश्चित बाजारभाव यामुळे शेतकऱ्यांचा संयम ताणला जात आहे. तरीही पर्याय नाही या कठोर वास्तवाला मान देत गावरान कांद्याची लागवड सुरूच आहे.अपेक्षांच्या ओझ्याखाली, आणि चांगल्या दिवसांच्या आशेने शेतकरी कांदा लागवड करत आहेत.

### ऊस पिकाकडे वाढतोय ओढा

▶ कांदा पिकवणे आमच्या हातात, पण बाजार भाव नाही. गेल्या वर्षी गावरान कांदा भाव न मिळाल्याने सडून गेला. यंदा तरी आमचे पीक वाया जाऊ नये, हीच अपेक्षा. केंद्र व राज्य सरकारकडून बाजारभावाबाबत होत असलेले दुर्लक्ष शेतकऱ्यांच्या नाराजीचे मुख्य कारण बनले आहे. परिणामी अनेक शेतकरी तुलनेने स्थिर असणाऱ्या उसाकडे वळत आहेत अशा प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिल्या.

# उत्तम ज्ञान मिळविण्यातच खरा आनंद : प्रा. देशमुख

**लोकमंथन प्रतिनिधी**




**कोपरगाव** : यूपीएससी व एमपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांनी मोठी झेप घेतली असून, प्रत्येक विद्यार्थ्याने मला काय व्हायचे आहे हा प्रश्न स्वतःला विचारून स्वतः ची ओळख शोधली पाहिजे. शिक्षण ही आज पात्रता असून ज्ञान म्हणजे केवळ माहिती नसून ते भविष्यात उपजीविकेचे साधन ठरले पाहिजे. अभिनय, लेखन, गायन, वादन, संपादन, जाहिरात, मानपत्र लेखन, मुलाखत व पाककला यांसारख्या विविध क्षेत्रांत कौशल्ये आत्मसात करण्याचे आवाहन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील माजी मराठी विभागप्रमुख प्रा. केशव सखाराम देशमुख यांनी केले.

ते रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरू गंगागिरी महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स कॉलेज, कोपरगाव येथे विद्यार्थी कल्याण मंडळ, वाड्मय मंडळ तसेच मराठी, हिंदी व इंग्रजी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित त्रिभाषा सूत्र : लेखन कौशल्य विकास कार्यशाळेत बोलत होते.प्रमुख वक्ते कला व वाणिज्य महाविद्यालय, सात्रळचे हिंदी विभागप्रमुख डॉ. अनंत केदारे म्हणाले की, भाषा हे मानवी अभिव्यक्तीचे प्रमुख माध्यम असून भाषिक कौशल्यांच्या आधारे जीवन अधिक सुसंस्कृत व समृद्ध करता येते. अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी विद्यार्थी–केंद्रित ४१ कौशल्याधारित उपक्रम, नवीन अभ्यासक्रम सुरु करण्याचा मानस व भाषांतराच्या गरजेवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संतोष पवार यांनी केले. सदर कार्यशाळेसाठी प्रा. उज्वला भोर, डॉ.रंजना वर्दे, डॉ. बंडेराव तऱ्हाळ, प्रा. तानसेन रणदिवे, प्रा. महेश दिघे, प्रा. आरती खामकर यांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेचे सूत्रसंचालन डॉ. भागवत देवकाते यांनी केले तर आभार डॉ. माधव यशवंत यांनी मानले.

# सकल मराठा समन्वयकपदी रावसाहेब धांडे

**लोकमंथन प्रतिनिधी**



**कर्जत** : सकल मराठा समाज या संघटनेची कर्जत मध्ये बैठक संपन्न झाली. यामध्ये कर्जत तालुका सकल मराठा समन्वयक पदी रावसाहेब धांडे यांची फेरनिवड करण्यात आली. रावसाहेब धांडे यांनी केलेल्या उत्कृष्ट कामाची दखल घेत संघटनेने पुन्हा एकदा रावसाहेब धांडे यांची फेरनिवड केली.

रावसाहेब धांडे यांनी मागील वर्षी समन्वयक म्हणून निवड झाल्यानंतर त्यांच्या कार्यकाळामध्ये सर्वात उत्कृष्ट शिवजयंतीचे नियोजन केले. मुंबई येथे मराठा आरक्षणाच्या आंदोलनाच्या लढ्यामध्ये देखील संपूर्ण तालुक्यामध्ये जनजागृती करून या लढ्यामध्ये कर्जत तालुक्यामधून बळ देण्याचे काम रावसाहेब धांडे यांनी केले.

कर्जत तालुका सकल मराठा समाज यांची कर्जत येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये बैठक झाली. बैठकीसाठी मराठा सेवक वैभव लाळगे, विजय तोरडमल, भाऊसाहेब तोरडमल, स्वप्निल तोरडमल, इंजिनीयर विशाल मांडगे, दीपक मांडगे, प्रसाद कानगुडे,श्रीहरी जगताप, मनोज गायकवाड, सचिन नेटके, सागर मांडगे, बंटी यादव, सतीश पठाडे, बाळू वाघ, अक्षय तोरडमल, महादेव तांदळे, प्रकाश जाधव,आप्पा काळे, तेजस पाटील, राम तोरडमल, सोमनाथ यादव, विजू नेटके, राहुल गांगर्डे,राहुल नवले, धीरज पडवळ,सागर मांडगे, नितीन तोरडमल, रमेश गांगर्डे, श्रीहरी जगताप, एडवोकेट धनंजय राणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

रावसाहेब धांडे यांचा उपस्थितांच्या वतीने सन्मान करण्यात आला. त्यावेळी बोलताना रावसाहेब धांडे यांनी सांगितले की, माझ्यावर सलग दुसऱ्यांना समन्वयक पदाची जबाबदारी सोपवली आहे आणि जो विश्वास व्यक्त केला आहे याबद्दल मी सर्व सहकार्याच आभार मानतो. आगामी काळात समाजाच्या हिताची काम करणार आहे. सकल मराठा समाजाच्या विविध मागण्या व आंदोलनासाठी भरीव काम करण्यात येईल.

# ऊस तोडणी टोळ्या वाढवून वाहतुकीचे नियोजन करणार

## गौरी शुगरकडून आश्वासन; भाजपकडून निवेदन

**लोकमंथन प्रतिनिधी**



**कर्जत** : तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसमोर सध्या ऊस तोडणी व वाहतुकीचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. ऊस तयार असतानाही वेळेवर तोड न झाल्याने आणि वाहन टोळ्यांच्या कमतरतेमुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत होते. ही बाब लक्षात घेऊन भारतीय जनता पक्षाच्या पुढाकारातून गौरी शुगर हिरडगाव यांना कारखाना कार्यस्थळावर जाऊन निवेदन देण्यात आले. एवढी तालुकाध्यक्ष अनिल गदादे, किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष दत्तात्रेय नलवडे, नगरसेवक प्रसाद ढोकरीकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

भारतीय जनता पक्ष, कर्जत तालुक्याच्या वतीने गौरी शुगरचे कार्यकारी संचालक यादव यांची भेट घेऊन कर्जत तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस लवकरात लवकर तोडून नेण्यासाठी पुरेशा वाहन व ऊस तोडणी टोळ्या तालुक्याला उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष अनिल गदादे, किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष दत्तात्रेय नलवडे, नगरसेवक प्रसाद ढोकरीकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

निवेदनात सांगण्यात आले की, कर्जत तालुक्यात मोठ्या प्रमाणावर ऊस उत्पादन होते. मात्र, वेळेवर ऊस तोडणी न झाल्यास ऊसाची साखर उतारक्षमता कमी होते, त्यामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित दर मिळत नाही. तसेच उशीर झाल्यास ऊस वाळण्याचा आणि नुकसान होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे ऊस तोडणी टोळ्या व वाहतूक व्यवस्था तातडीने उपलब्ध करणे अत्यंत आवश्यक आहे.

या मागणीची दखल घेत गौरी शुगरचे कार्यकारी संचालक यादव यांनी कर्जत तालुक्यासाठी जास्तीत जास्त ऊस तोडणी टोळ्या देण्याचे आश्वासन दिले. तालुक्यातील ऊस प्राधान्याने तोडून कारखान्यापर्यंत पोहोचवण्यासाठी नियोजन केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या या सकारात्मक प्रतिसादामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

या संपूर्ण प्रक्रियेमुळे कर्जत तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे आणि आशेचे वातावरण निर्माण झाले असून, भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली घेतलेल्या या प्रयत्नाचे शेतकरी वर्गातून स्वागत केले जात आहे.

HDFC BANK
We understand your world

**नोंदणीकृत ऑफिस** : एचडीएफसी बँक हाऊस, सेनापती बापट मार्ग, लोअर परेळ, (पश्चिम) मुंबई –४०००१३ आणि येथेसुद्धा रिटेल पोर्टफोलियो, मॅनेजमेंट, एचडीएफसी बँक लिमिटेड, पहिला मजला, आय–थिंक टेकनो कॅम्पस, कांजुरमार्ग (पूर्व) मुंबई–४०००४२.

**लिलाव विक्री नोटीस**

कर्जदारांना विशेषतः कर्जदारांना आणि सार्वजनिकपणे जनतेला सूचित केले जाते की, खालील खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा सार्वजनिकरित्या लिलाव करण्याचे प्रस्तावित आहे. एचडीएफसी बँक लिमिटेड (बँक) ने कर्जाची थकबाकी फेडण्यासाठी नोटीस देवूनही स्वाक्षरी केलेल्या आणि स्वीकारलेल्या कर्ज कराराच्या अटींनुसार, कर्जदार कर्जाची परतफेड करण्यास अपयशी ठरल्याने कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव आयोजित केला आहे. बँकेने कर्जदारांना एक नोटीस देखील जारी केली होती ज्यामध्ये, खालील खात्यांमधील संपूर्ण थकबाकी परतफेड करण्यासाठी ७ दिवसांचा वेळ देण्यात आला होता, अन्यथा बँक पुढील सूचना न देता संपूर्ण तारण ठेवलेल्या सोन्याच्या तारणाचा लिलाव करण्यास स्वतंत्र असेल. कर्जदारांनी दुर्लक्ष केले आहे आणि पैसे देण्यास अयशस्वी ठरले आहे, म्हणून, कर्ज कराराच्या अंतर्गत बँकेने तारण ठेवलेल्या संपूर्ण सोन्याचे दागिने/तारण लिलावाद्वारे विकून आणि कर्जदारांनी बँकेला दिलेली थकबाकी वसूल करून सोन्याच्या तारणावर तारण लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

**लिलाव २२–१२–२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजल्यापासून खालील शाखांमध्ये आयोजित केला जाईल. जर कोणत्याही तारण ठेवलेल्या सिक्युरिटीचा लिलाव नमूद केलेल्या तारखेला करता आला नाही किंवा पूर्ण करता आला नाही, तर बँकेला पुढील कोणत्याही तारखेला आणि वेळी लिलाव करण्याचा किंवा पुढे जाण्याचा अधिकार आहे.**

| कर्ज क्रमांक | कर्जदारांचे नाव | कर्जाची रक्कम | लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| ७५४६४८२९ | समीर राजमोहम्मद शेख | २४००० | एचडीएफसी बँक, वरचा मजला, शॉप नंतर १ ते २, टीएस नंबर १९७२ ए, फायनल प्लॉट नंबर ३, काला राम मंदिर रोड, सिद्धीविनायक मंदिराजवळ, श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर, महाराष्ट्र ४१३७०९ |
| ७४४०८१५४ | रोहित सुरेश सुतार | २०३०० | |
| ७४०४०३२१ | अमीरखान राजेखान पठाण | ७८१०० | एचडीएफसी बँक लि. ब्रम्हचैतन्य कॉम्प्लेक्स, बगाडे कार्नर, श्रीगोंदा, महाराष्ट्र ४१३७०१ |
| ७५८९८४४४ | सुभाष संतू ढोणे | ४५६०० | हॉटेल शांती कमल, नगर–मनमाड हायवे, शिर्डी, राहाता, जिल्हा अहमदनगर, शिर्डी, महाराष्ट्र ४२३१०९ |
| ७४५६३६५८ | महेश बाळासाहेब काळे | १०४००० | एचडीएफसी बँक लि., तळमजलर, लक्ष्मीनगर, न्यू कोर्ट बिल्डिंग शेवगाव, शेवगाव, महाराष्ट्र ४१४५०२ |

लिलाव 'जसे आहे तेथे' आणि 'जसे आहे त्याच' तत्वावर घेण्यात येईल. आणि बँक सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेटेज, वजन किंवा मूल्यांकनाबाबत कोणतेही प्रतिनिधित्व किंवा हमी देत नाही आणि देणार नाही. बोली लावण्यापूर्वी सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेटेज, वजन किंवा मूल्यांकनाची पडताळणी करणे, तपासणी करणे आणि स्वतःचे समाधान करणे ही संभाव्य खरेदीदारांची एकमेव आणि संपूर्ण जबाबदारी असेल आणि अशा उद्देशाने संभाव्य खरेदीदारांना लिलाव आयोजित करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेच्या ४५ मिनिटे आधी तज्ज्ञांच्या सल्ल्यासह किंवा त्याशिवाय सोन्याचे दागिने त्यांच्या स्वतःच्या खर्चाने आणि खर्चाने तपासण्याची परवानगी असेल. सर्व बोली बँक या संदर्भात निश्चित करण्यास योग्य वाटेल अशा किमान राखीव किंमतीच्या अधीन असतील. लिलावाचे मूल्य आयबीजेए (इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन लिमिटेड) नुसार मागील दिवशी सोन्याच्या बंद किंमतीवर आधारित असेल. अशा लिलावानुसार लिलाव प्रक्रिया आणि विक्री (जर असेल तर) बँक तिच्या स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार लादण्यास योग्य वाटेल अशा पुढील अटी आणि शर्तींच्या अधीन असेल. जर वर नमूद केलेल्या कर्जदाराने कर्ज कराराच्या अटींनुसार बँकेला देय असलेली रक्कम वर नमूद केल्याप्रमाणे लिलावापूर्वी त्याच्या वैयक्तिक कर्ज खात्यात पूर्णपणे भरली, तर कर्ज सुरक्षित करणारे तारण दागिने बँकेला पुढील कोणत्याही सूचना न देता लिलावातून काढून घेण्यात येईल. कृपया लक्षात ठेवा की बँकेच्या अधोस्वाक्षरीकृत अधिकृत अधिकाऱ्याचा पूर्ण विवेकाधीन अधिकार आहे, तो एकतर पूर्व सूचना न देता आणि कोणतेही कारण न देता लिलाव प्रक्रिया पुढे ढकलण्याचा किंवा रद्द करण्याचा आणि कोणतेही कारण न देता कोणत्याही किंवा सर्व बोली किंवा ऑफर नाकारण्याचा अधिकार बँकेला आहे.

**दिनांक : १५.१२.२०२५** — **सही/–**
**ठिकाण : अहमदनगर** — **अधिकृत अधिकारी, एचडीएफसी बँक लिमिटेड**